<u>विशेष दिवाणी दावा क्र. २१/२०२३</u>

*मनिषा माने*

*विरुध्द*

*अविनाश माने*

## <u>निशाणी २४ खालील आदेश</u>

## <u>(**CNR No. MHSN**050012282023)</u>

वादीने प्रस्तुत अर्ज कागदपत्र दाखल करण्यास परवानगी मिळणेबाबत दाखल केला आहे.

२. अर्ज व म्हणणे वाचले. वादीचे कथनानुसार, अर्जासोबत पगारपत्र जोडले असून ते अभिलेखावर घेणे आवश्यक आहेत. सबब, त्यांनी अर्ज मंजूर करण्याची विनंती केली. उलटपक्षी, प्रतिवादीने कागदपत्र अमान्य असल्याचे कथन करून अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

३. अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्राचे अवलोकन केले असता ते प्रतिवादीचे पगारपत्रक असल्याचे दिसते. प्रस्तुत प्रकरणात वादीने पोटगी मिळणेबाबत अनुतोष मागीतल्याबाबत दुमत नाही. प्राप्त परिस्थिती व कागदपत्रांचे स्वरुप लक्षात घेता मी या निष्कर्षाप्रत आलो आहे की, कागदपत्र दाखल करून घेण्यापुरता अर्ज मंजूर करण्यायोग्य आहे. परिणामी, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

## <u>आ दे श</u>

कागदपत्र दाखल करून घेण्यापुरता अर्ज मंजूर करण्यात आला.

KARLEKAR BHAGWAN MAHAJAN

Digitally signed by KARLEKAR BHAGWAN MAHAJAN
Date: 2026.03.11 15:46:47 +0530

(भगवान म. कारलेकर)

दिनांक:– ०७/०३/२०२६. सह दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर

इस्लामपूर. इस्लामपूर.

***